महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 982 /२०२४ दि. 22/08/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २७/०८/२०२४ रोजी संकल्प प्रतिष्ठान, ठाणे यांचे वतीने **'गोपाळकाला'** सणामिमित्त संकल्प चौक येथे मंडप उभारण्यात येणार आहे. तसेच सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साईमास हॉटेल/मोहनजी सुंदरजी मार्ग कडून संकल्प चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साईमास हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सर्व्हिस रोडने सरळ जावून एल. आय. सी. ऑफिस कडून डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) जुना पासपोर्ट ऑफिस कडून संकल्प चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डींग** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डींग कडून डावे वळण घेवून हाजूरी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) हाजूरी कडून संकल्प चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **हाजूरी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने हाजूरी चौकातून डावीकडे वळण घेवून एल.आय.सी. कट येथून पुढे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २७/०८/२०२४ रोजी सकाळी १०:०० ते रात्रौ २२.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक/पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी,**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, परिवहन उपक्रम ठाणे महानगरपालिका, ठाणे व बृहन्मुंबई मनपा (बीईएसटी)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १, ठाणे व परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ ठाणे वाहतूक उपविभाग, प्रभारी अधिकारी, वागळे इस्टेट/नौपाडा वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner